जा क्र मसके/प्रअरू/ठेका/५२/ /२०२३
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
दिनांक : १५/02/2023

# जाहीर नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत रूखी येथील प्रक्षेत्रावर खालिल प्रमाणे कामे करावयाची आहेत.

| कामाचा तपशिल<br>(कालावधी ०१.०३.२०२३ ते २४.०३.२०२३) |
|---|
| **क्षेत्र ३.१९ हे. झाडांची संख्या ३१९**<br>१. फणस व कोकम लागवडीतील झाडांच्या बुंध्याजवळची आणि झाडाच्या विस्ताराखालील ग्लिरीसीडीया गवत,लाजरी, करवंद सारखी सर्व काटेरी झुडपे, जमिनी लगत तोडून, तोडलेला कुजण्यायोग्य पाला पाचोळा गोळा करने, गोळा केलेला कुजण्यायोग्य पालापाचोळा सरळ ओळींमध्ये चेपून बेड तयार करणे.<br>२. मेलेली फणस व कोकम झाडे बुंध्यासकट काढून गट रचणे<br>३. जळाऊ लाकूड तोडून, गोळा करून त्याचे ब्रास सारखे चौकोनी गट रचून ठेवणे.<br>४. फणस व कोकम बागेतील सुकलेल्या फादया तोडुन गट रचुन बोर्डोपेस्ट लावणे. |

उपरोक्त प्रमाणे प्रक्षेत्रावरील कामे ठेका पध्दतीने करावयाची आहेत. कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती तसेच भरून दयावयाचे संमतीपत्र आणि दरपत्रक नमूना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी कामाचे दरपत्रक भरून दयावयाचे आहे. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमूना पत्रामध्येच भरून द्यावयाचे आहे. आपले दरपत्रक आणि संमतीपत्र या कार्यालयात दिनांक २७.०२.२०२३ पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे पाठवावे. विहीत दिनांकानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **"रूखी विभागाअंतर्गत फणस व कोकम बागेची साफसफाई करणे"** असा उल्लेख करावा, लिफाफा मोहोरबंद करून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली (रूखी विभाग) यांचे नावे पाठवावा. पोस्टाव्दारे होणा-या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. दरपत्रकाच्या अटी व शर्ती सोबत जोडण्यात येत असून त्या ठेकेदारास बंधनकारक असतील. सदर अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून दरपत्रकासोबत जोडण्यात याव्यात.

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली.

प्रत माहिती व पुढील जरूर त्या कार्यवाहीसाठी सादर...
१. नोटीस बोर्ड, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
२. ग्रामपंचायत कार्यालय : रूखी, गावतळे, असोंड, टेटवली

# ठेक्याबाबतच्या सर्वसाधारण अटी व शर्ती

१ ठेकेदाराने ठेका सादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर कामाचे स्वरुप पाहूनच दरपत्रकामध्ये/दरपत्रक/निविदेमध्ये दर सादर करावेत.

२ ठेका मंजूरी आदेश प्राप्त होताच मंजूरी पत्रामध्ये दिलेल्या दिनांकापासून निम्नस्वाक्षरीकार/विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांनी दिलेल्या सुचनांनुसार व त्यांचे देखरेखीखाली काम करावयाचे आहे.

३ ठेकेदाराने नेमलेल्या मजूरांना श्रम व रोजगार मंत्रालय नवी दिल्ली यांचा **F.NO. 1/13(1)/2017-LS-11** दिनांक १७.३.२०१७ च्या अनुषंगाने शासनाच्या किमान वेतन दरानुसार वेतन देण्यात येते, असे प्रमाणपत्र ठेक्याचे देयक कार्यालयास सादर करतेवेळी देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र देयकासोबत नसल्यास देयकाची अदायगी करण्यात येणार नाही.

४ कामाच्या मजुरीची अदायगी पंधरा दिवसानंतर अथवा महिना पुर्ण झाल्यावर करण्यात येईल . संबंधित देयक सादर करताना विभाग प्रमुख/प्रक्षेत्र प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांचेकडील कामे वेळेत पूर्ण केलेबाबतचा दाखला देयकासोबत जोडणे बंधनकारक राहील.

५ ठेका अपुर्ण सोडल्यास ठेक्याच्या बीलाची अदायगी केली जाणार नाही व सदर कामाचा अनुभव पुढील ठेक्याच्यावेळी गृहीत धरला जाणार नाही. तसेच संबंधित ठेकेदाराचे दरपत्रक/निविदा पुढील ठेक्याच्यावेळी ग्राह्य धरले जाणार नाही.

६ प्रक्षेत्रावर दिलेल्या सुचनेनुसार करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदाराने करणे बंधनकारक असेल, सुचनांचा अवमान केल्यास ठेका त्वरीत बंद केला जाईल आणि त्याबाबत ठेकेदाराच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

७ ठेकेदाराकडे पॅनकार्ड व बॅक खाते असणे बंधनकारक आहे. ठेकेदाराच्या देयकाची अदायगी त्याचे बॅक खाती **N.E.F.T./R.T.G.S.** धनाकर्षाव्दारे करण्यात येईल.

८ ठेकेदाराने कामावर ठेवलेल्या कामगारांना अपघात/सर्पदंश/विंचूदंश झाल्या संबंधित कामगारावर योग्य ते उपचार करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाव्दारे करण्यात येणार नाही.

९ कामाच्या कालावधीत ठेकेदार अथवा त्याच्या कामगाराकडून/मजूरांकडून प्रक्षेत्राच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास ठेकेदाराच्या देयकामधून संबंधित नुकसानीची किंमत वसुल करण्यात येईल आणि त्याबाबत ठेकेदारावर कायदेशिर कार्यवाही करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना असेल.

१० ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधा तसेच त्यांच्या कार्यपध्दतीचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल. कार्यालयाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे ठेकेदारास बंधनकारक आहे. तसे न केल्यास ठेकेदारास देण्यात आलेल्या ठेका कोणत्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

११ सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्रमांक SLP-5443/90 नुसार ठेकेदारास किंवा ठेकेदाराने नेमलेल्या मजूरास/इसमास ठेका कालावधीमध्ये/ठेका कालवधी नंतर विद्यापीठ/शासकीय सेवेत कायम स्वरुपी नोकरी मिळण्यास अधिकार राहणार नाही व तसा दाखला देण्यात येणार नाही.

१२ ज्या कंपनीस/संस्थेस/व्यक्तीस ठेका देण्यात येईल त्यांनी उपरोक्त अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार लिखित स्वरुपात करणे बंधनकारक राहील. कंपनी/संस्थेतर्फे/ठेकेदारामार्फत कामावर ठेवलेल्या कर्मचाऱ्याच्या ठेवलेले कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठावर असणार नाही.

१३ शासन निर्णयानुसार पध्दतीप्रमाणे ठेकेदाराचे देय्यकातून आयकर कपात करण्यात येईल.

१४ झाडी/झुडपे जमिनीलगत तोडणे बंधनकारक राहील. झाडी/झुडपे जमिनीलगत तोडण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रसामुग्री ही ठेकेदाराने स्वतः आणावयाची आहे व यंत्रसामुग्रीची देखभाल व दुरूस्तीची जबबदारी ठेकेदाराची राहील.

१५ फणस व कोकम झाडांवरील बांडगुळ व सुकलेल्या फांदया झाडाचे नुकसान न करता तोडावयाच्या आहेत.

१६ साफ सफाई करतेवेळी निघणारा कुजण्यायोग्य पालापाचोळा सरळ रेषेमध्ये दोन झाडांमध्ये रचून ठेवावयाचा आहे व जळाऊ लाकूड असल्यास स्वतंत्र गट करावयाचा आहे.

१७ साफ सफाई करतेवेळी जी झाडे तोडण्यास वन खात्याची परवानगी आवश्यक असते अशी झाडे म्हणजेच साग, खैर, शिवण ही झाडे तोडावयाची नाहीत.

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.

जा.क.मसके/रूखी/ठेका/५२/२०२३
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
दिनांक : १५/02/2023

प्रती,

मा. व्यवस्थापक,
कृषिज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली

**विषय :**रूखी विभागाअंतर्गत फणस व कोकम बागेतील साफसफाई करणेसाठी ठेका पध्दतीने कामे करण्यास जाहिरातीस विद्यापीठ संकेतस्थळावर (www.dbskkv.org) प्रसिध्दी देणे बाबत............

महाशय

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की या केंद्रास रूखी विभागाकरीता फणस व कोकम बागेतील साफसफाई करणेसाठी ठेका पध्दतीने कामे करण्यास त्याबाबतची प्रसिध्दी विद्यापीठ संकेतस्थळावर (www.dbskkv.org) करणेस विनंती आहे. सोबत प्रसिध्दी नमुना जोडणेत येत आहे.

सोबत : वरील प्रमाणे.

आपला विश्वासू,

**संचालक,**
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली,
ता. दापोली जि. रत्नागिरी